Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 11 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या गुजरातच्या तीन दिवसीय दौऱ्यात आज दुस-या दिवशी सकाळी वेरावळ जिल्ह्यातील प्रभास पाटन मधील सोमनाथच्या शिवमंदीरात आयोजित स्वाभिमान पर्वात थोड्यावेळेपूर्वी सहभागी झाले. सोमनाथचं हे मंदीर राष्ट्रीय गौरवाचं शक्तीशाली प्रतिक असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी नमूद केलं आहे. सोमनाथ मंदिरावरील आक्रमणाचं हजारावं स्मरणवर्ष तसंच वर्ष १९५१ मधील याच्या जीर्णोद्धाराच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हे स्वाभिमान पर्व साजरं होत आहे. मंदिरातल्या पूजेनंतर एका जाहीर सभेलाही पंतप्रधान संबोधित करत आहेत.

****

महापालिका निवडणूक चार दिवसांवर आलेली असतानाच प्रचार आता शिगेला पोहचत आहे. आज मतदानाआधीच्या रविवार- सुटीच्या दिवशी विविध राजकीय पक्ष, उमेदवारांनी प्रचारांसाठी सकाळपासूनच उपक्रम सुरू केले आहेत. प्रचार फेऱ्यांना प्रारंभ झाला आहे. कोपरा सभा होणार आहेत. प्रमुख नेते झंझावाती प्रचार दौरे करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत धारावी इथं प्रचार सभा घेतली. धारावीचा पुर्नविकास कुणी खासगी व्यक्ति नाही तर राज्य सरकार आणि एसआरएच्या भागीदारीतून केला जात आहे; प्रत्येक धारावीकराला याच ठिकाणी घर मिळणार आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल कोल्हापूर आणि नाशिकमध्ये जाहीर सभा घेतल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पिंपरी चिंचवडमध्येही आपापल्या पक्ष उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतल्या. शरद पवार -अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचा पुणेकरांसाठीचा संयुक्त जाहीरनामा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत काल जाहीर झाला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रचार सभा घेतली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं काल पुणे महापालिका निवडणुकीचा वचननामा प्रकाशित केला.
राज्यातली निवडणूक प्रक्रिया पारदर्शक नसून भाजप राज्यातील सर्वात दुबळा पक्ष बनला आहे. त्यामुळंच त्यांना निवडणुकांमध्ये गैरप्रकार करावा लागत आहे, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केला. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये काल प्रचार सभा घेत पक्षाच्या उमेदवारांना विजयी करण्याचं आवाहन केलं.

****

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या गुरुवारी मनपा क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मतदान क्षेत्रातील मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याची सूचना मतदार संघातील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना करण्यात आली आहे. अपवादात्मक परिस्थितीत मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पूर्ण सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची सवलत देता येईल, असं या पत्रात म्हटलं आहे.

****

भारतापुढे फक्त देशाच्या सीमा संरक्षित ठेवण्याचंच आव्हान नाही, तर आर्थिक आघाडीवरही देशाला सज्ज राहावं लागतं, असं मत देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी व्यक्त केलं आहे. नवी दिल्लीत काल विकसित भारत युवा नेता संवाद-२०२६ परिषदेला सुरुवात झाली त्यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी परिषदेचं उद्घाटन केंद्रीय युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांच्या हस्ते झालं. देशाच्या भविष्याला आकार देण्यात तरुणांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचं मांडवीय यांनी त्यावेळी बोलतांना नमूद केलं. तंत्रज्ञान, उद्योग, प्रशासन, शाश्वत पर्याय आणि सामाजिक विकासाच्या क्षेत्रांत विविध उपाय सुचवण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन मिळावं, हे या संवादामागचं उद्दिष्ट असल्याचं मांडवीय म्हणाले.

****

सध्या राज्यात कोरडं हवामान असून किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे.फक्त, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात तुरळक ठिकाणी येत्या १८ तासांत हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात होत असून, पहिला सामना वडोदरा इथं खेळला जाणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल. चौदा तारखेला दुसरा सामना राजकोट इथं तर तिसरा सामना १८ तारखेला इंदूर इथं होणार आहे. या मालिकेनंतर दोन्ही संघात पाच सामन्यांची टी ट्वेंटी मालिकाही खेळवली जाणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा पहिला केंद्रीय लोककला महोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. यात चार रंगमंचावर ११ कलाप्रकार सादर होणार असून ३७७ कलावंत सहभागी होणार आहेत, या महोत्सवात चार जिल्ह्यातल्या संलग्नित महाविद्यालयांचे ६१ संघ, तर विद्यापीठ आणि उपपरिसराचा प्रत्येकी एक संघ असे एकूण ६३ संघ सहभागी होत आहेत.

****

२१ व्या लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचं आज नांदेड इथं आयोजन करण्यात आलं आहे. रविचंद्र हडसनकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या संमेलनात कथाकथन, कविसंमेलन, प्रकट मुलाखत, एकपात्री प्रयोग आदी कार्यक्रम होणार आहेत. सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय तसंच प्रशासकीय सेवेतल्या योगदानासाठी लोकसंवाद पुरस्कारही या संमेलनात प्रदान केले जाणार आहेत

****